
ना नफा! ना तोटा!
पशुखाद्य
गौ माता भोजन ५ कि. गुळ पावडर बॅग
200/– रुपये मात्र
हळद २८० रू. किलो, खोबरे १४० रू. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००/९६८९०४३५५१)


# आपला महाराष्ट्र


मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
संयुक्त वर्ष ६७ ■ अंक क्र.१७४ ■ शनिवार ३० मार्च २०२४ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४
POST REGD.NO./DHL/53/24-26



आकर्षक लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900


## प्राप्तिकर विभागाकडून काँग्रेसला वसुलीची नोटीस
## भाजपचा टॅक्स टेररिझम : पक्षाचा गंभीर आरोप

**नवी दिल्ली, दि.२९– प्राप्तिकर विभागाने काँग्रेसला पुन्हा जोरदार दणका दिला आहे. पक्षाला एक हजार सातशे कोटींच्या वसुलीची नोटीस पाठवण्यात आली आहे. त्यानंतर काँग्रेसकडून भाजपवर जोरदार हल्लाबोल करण्यात आला आहे. हा भाजपचा टॅक्स टेररिझम अर्थात कर दहशतवाद असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. प्राप्तिकर विभागाने भाजपकडेही कराचा हिशोब मागायला हवा, अशी मागणीही काँग्रेसकडून करण्यात आली आहे.**



काँग्रेसचे नेते जयराम रमेश आणि अजय माकन यांनी आज पत्रकार परिषदेत भाजपवर निशाणा साधला. भाजपकडून प्राप्तिकर कायद्यांचे उल्लंघन करण्यात आले आहे. हा गंभीर प्रकार आहे. या उल्लंघनापोटी विभागाने भाजपकडे ४ हजार ६०० कोटींहून अधिक रकमेची मागणी करायला हवी, अशी मागणी काँग्रेसच्या नेत्यांनी केली. निवडणूक रोखे योजनेचा उल्लेख करत जयराम रमेश म्हणाले, भाजपने निवडणूक रोखे घोटाळ्यातून ८ हजार २०० कोटी रुपये गोळा केले. त्यासाठी प्री-प्रेड, पोस्ट-पेड, पोस्ट-रेड लाच आणि शेल कंपन्यांचा मार्ग अवलंबला. दुसरीकडे भाजप टॅक्स टेररिझममध्ये व्यस्त असल्याची आरोपही जयराम रमेश यांनी केला.

काँग्रेसची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण आम्ही झुकणार नाही. पक्षाचा आगामी निवडणुकीतील प्रचार सुरूच राहील. आम्ही पक्षाच्या गॅरंटी लोकांपर्यंत घेऊन जाऊ. अशा नोटीसला आम्ही घाबरत नाही. आम्ही अधिक आक्रमकपणे निवडणीकीत उतरू, असेही जयराम (पान ४ वर)

### केजरीवालांना आशीर्वाद द्या; व्हॉट्सअ‍ॅप मोहीम

नवी दिल्ली, दि.२९– दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्यात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक होऊन आठवड्याच्यावर कालावधी उलटून गेला आहे. त्यांना १ एप्रिलपर्यंत ईडी कोठडी सुनावण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे केजरीवालांच्या अटकेविरोधात आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून दररोज निर्देशने करण्यात येत आहेत. अशात आता अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांनी केजरीवालांना आशीर्वाद या नावाने व्हॉट्स अ‍ॅप मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत सुनीता केजरीवाल यांनी एक व्हॉट्स अ‍ॅप नंबर शेअर केला आहे. अरविंद केजरीवाल यांना पाठिंबा देण्यासाठी (पान ४ वर)

## नंदुरबारचा गड काँग्रेस पुन्हा खेचून आणणार!
## आ.कुणाल पाटलांसह नेत्यांनी केला निर्धार

**नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी) – संपूर्ण भारतात मोदीविरोधी लाट आहे. नंदुरबार लोकसभा मतदारसंघ हा आधी पासून काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे. दहा वर्षांपूर्वी भाजपकडे गेलेला हा गड पुन्हा काँग्रेसकडे खेचून आणण्यासाठी महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी कटिबद्ध असून यंदा कुठल्याही परिस्थितीमध्ये काँग्रेसचे उमेदवार अ‍ॅड. गोवाल पाडवी यांचा विजय निश्चित आहे, असा विश्वास काँग्रेसचे आमदार कुणाल पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.**




माजी आदिवासी विकास मंत्री अ‍ॅड.के.सी. पाडवी यांच्या निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये माजी आमदार उदेसिंग पाडवी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अरुण चौधरी, धुळ्याचे माजी आमदार शरद पाटील, शिवसेनेचे दीपक गवते, काँग्रेसच्या प्रतिभा शिंदे, उमेदवार अ‍ॅड.गोवाल पाडवी आदींसह नंदुरबार धुळे जिल्ह्यातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आ.पाटील म्हणाले, काँग्रेसचे नेते नेहमीच नंदुरबार जिल्ह्यावर प्रेम करत आले आहेत. खांडबारा येथे तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधीची सभा असेल किंवा सोनिया गांधींची सभा असेल ही स्मरणात राहिली (पान ४ वर)



## धुळ्याजवळ गांजाची अवैध तस्करी रोखली
## तीन लाख छत्तीस हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**धुळे, दि.२९– मध्यप्रदेशातील इंदौरकडून मुंबईकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.०३ वर धुळे शहराजवळील हॉटेल देशविदेश जवळील गतिरोधकाजवळून एकवीस किलो गांजाची तस्करी करणारे वाहन पोलीसांच्या दोन पथकांनी पकडले. आरोपींकडून सहा लाख छत्तीस हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.**

शहर पोलीस स्टेशनचे पोकॉ.महेश मोरे, मनिष सोनगीरे, व प्रविण पाटील यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार मध्यप्रदेशातून वाहन क्र.एमएच ०५/सीव्ही-३८४६ मधून गांजाची चोरटी वाहतूक होणार असल्याचे समजले. त्याअनुषंगाने पोनि.धिरज महाजन यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, सहा.पोलीस (पान ४ वर)

### वडणे येथे गळफास घेवून आत्महत्या

धुळे, दि.२९– धुळे तालुक्यातील वडणे गावात पन्नास वर्षीय इसमाने निंबाच्या झाडास गळफास घेवून आत्म हत्या केल्याची घटना घडली आहे.नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, वडणे येथील बाळु सोनु ठाकरे (वय ५०)हे राहत्या घराजवळील निंबाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. परिसरातील नागरिकांच्या मदतीने बाळु ठाकरेंना खाली उतरवून सोनगीर येथील ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉ.शिंदे यांनी तपासून मयत घोषित केले.याप्रकरणी सोनगीर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## पाण्यासाठी महिलांचा सामोडे चौफुलीवर रास्ता रोको
## अधिकाऱ्यांना धरले धारेवर; टँकर वाढविण्याची ग्वाही



**पिंपळनेर, दि.२९ (प्रतिनिधी) – साक्री तालुक्यातील सामोडे ग्रामपंचायत हद्दीतील नवापूर रोड, टेंभा रोड, घोड्यामाळ, पोलीस स्टेशन परिसरात नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहेत. त्यामुळे आज संतप्त महिलांनी भर उन्हात नवापूर रस्त्यावर रास्तारोको आंदोलन केले.**

सामोडे, घोड्यामाळ व टेंभा रोड भागात आठ दिवसाआड पाणी येत आहे. त्यामुळे जनता त्रस्त झाली आहे. कुठेतरी एक दोन दिवसात एक किंवा दोन टँकरने पाणी ठराविक परिसरात येते. त्यामुळे मोठी गर्दी होवून टँकरवर पाणी भरण्यासाठी महिला व पुरुषांमध्ये वाद, मारहाणीचे प्रकार पहावयास मिळत आहेत. त्यामुळे आज या परिसरातील महिला व नागरिकांनी नवापूर रस्त्यावर पार्वती हॉस्पिटल समोर रास्तारोको केला. आंदोलनाची माहिती कळताच पोलीस पथकासह दाखल झाले. मात्र संतप्त महिला (पान ४ वर)



### मा.राज्य मंत्री मीनाक्षी पाटील यांचे निधन

मुंबई, दि.२९– शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी सकाळी निधन झाले. त्या दीर्घकाळ आजारी होत्या. त्यांच्यावर आज पेझारी येथे दुपारी २ वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. शेतकरी कामगार पक्षाच्या झुंजार (पान ४ वर)



## धोकेदायक वळण रस्त्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे, गतिरोधक बसविण्याची मागणी

**नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी) – शहरातून जाणाऱ्या वळण रस्त्यावर दररोज वाळू वाहतूक करणारे डंपर आणि ट्रक या जड वाहनांची वर्दळ वाढली आहे. जिल्हा प्रशासनाने गंभीरतेने दखल घेऊन सीसीटीव्ही कॅमेरे व गतीरोधक बसविण्याची मागणी नंदुरबार जिल्हा प्रोफेशनल फोटोग्राफर असोसिएशनतर्फे करण्यात आली आहे.**

यासंदर्भात जिल्हाधिकारी मनीषा खत्री यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, एक आठवड्यापूर्वी एका सायकलस्वार शालेय विद्यार्थिनींचा आणि त्यानंतर दुचाकीस्वार फोटोग्राफर युवकाचा अपघातात बळी गेला. यामुळे जनतेमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. वाळू वाहतूक करणाऱ्या जड वाहनांच्या अति वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे नवापूर चौफुली, दंडपाणेश्वर मंदिर, मिराज सिनेमा, कल्याणेश्वर गणपती मंदिर, वीरशैव लिंगायत गवळी समाज स्मशानभूमी, धुळे चौफुली, जाणता राजा चौक, छत्रपती हॉस्पिटल, जगतापवाडी, उड्डाणपूल, करण चौफुली, जिजामाता महाविद्यालय, सीबी पेट्रोल पंप, जोगनी माता मंदिर जवळ आदी (पान ४ वर)

### प्रणाली मराठेंच्या कवितेस पारितोषिक

धुळे, दि.२९– गझलकार, कवी, साहित्यिक, लेखक विजय वडवेराव, पुणे स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या स्पर्धेमध्ये देशातील विविध राज्यांतील तसेच विदेशातील कवींनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी जवळपास सहाशेहून अधिक कविता प्राप्त झाल्यात. धुळ्याच्या शिक्षिका प्रणाली गायकवाड (मराठे) यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. त्यात प्रणालीताई यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील कविता लेखन स्पर्धेत उत्तेजनार्थ पुरस्कार जाहीर झाला आहे. भिडेवाडा बोलला या विषयाच्या (पान २ वर)



### शिक्षक भारती संघटनेच्या प्रयत्नांना यश
## संदिग्ध प्रश्नांचे गुण मिळणार
## दहावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा

**धुळे, दि.२९– शिक्षक भारतीच्या निवेदनानंतर इयत्ता दहावीच्या विज्ञान-१ विषयाच्या बोर्डाच्या पेपरमधील संदिग्ध प्रश्नाच्या दोन्ही उत्तरांना गुण देणेबाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचे पत्र निर्गमित झाले आहे.**

दि.१८ मार्च रोजी इयत्ता दहावीचा विज्ञान-१ या विषयाचा बोर्डाचा पेपर झाला. यात प्रश्न-१ (इ) मधील सर्वात लहान आकाराच्या अणूचे नाव लिहा. या प्रश्नाच्या उत्तराबाबत विद्यार्थी आणि पालक यांच्या मनात संदिग्धता निर्माण झाली होती म्हणून शिक्षक भारतीचे आमदार कपिल पाटील यांनी अध्यक्ष/सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांना निवेदन दिले होते. म्हणून हायड्रोजन आणि हेलियम या दोन्ही उत्तरास मार्क मिळणार आहेत, अशी माहिती शिक्षक नेते तथा शिक्षक भारती संघटनेचे राज्यसचिव राजेंद्र लोंढे यांनी दिली. वैज्ञानिकदृष्ट्या विचार करता त्याचे अचूक उत्तर हायड्रोजन हे (पान ४ वर)

### गाथा वीर योद्धांची नंदुरबारला कार्यक्रम

**नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी)– हिंदु सेवा सहाय्य समिती आयोजित गाथा वीर हिंदू योद्धांची या कार्यक्रमाचे आयोजन रविवार ३१ मार्च रोजी डॉ.काणे गर्ल्स हायस्कूल मैदानावर सायंकाळी ६ वाजता करण्यात आले आहे. प्रमुख वक्ते म्हणून श्री राजा महाराज शेंडे, हिंगणघाट उपस्थित राहून ते सत्य इतिहासावर प्रकाशझोत टाकणार आहेत.**

शिवजयंती आणि वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांचा राज्याभिषेक सोहळ्यानिमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज आणि वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह या दोन हिंदू वीर योद्धांची हिंदु धर्मासाठी केलेल्या त्यागाची यशोगाथा या कार्यक्रमाचा माध्यमातून मांडली जाणार आहे. इतिहासाची मोडतोड करून असत्य आणि खोटा इतिहास बऱ्याचवेळा मांडला जातो, हिंदूंना आपल्या वीर योद्धांचा पराक्रमाचा सत्य इतिहास माहिती व्हावा, गुलामीच्या नव्हे तर शौर्य, पराक्रमाचा (पान ४ वर)



## हद्दवाढीसह शहरातील पाचशे पाच मालमत्ताधारकांनी केला करभरणा

**धुळे, दि.२९– महापालिकेची थकबाकी वाढल्याने मालमत्ता व पाणीपट्टी कर वसुलीसाठी शास्तीमाफी देण्यास सुरूवात केली. थकबाकीदार मालमत्ताधारकांना मार्च अखेर पर्यंत भरणा करण्याची संधी दिल्याने मालमत्ताधारकांनी रांगेत उभे राहून करभरणा केला. शहरातील चारशे दोन व हद्दवाढीतील थकबाकीदार अशा एकूण पाचशे पाच मालमत्ताधारकांनी शासकीय सुटीच्या दिवशीही गुड फ्रायडे असतांना करभरणा केला असल्याची माहिती अधिकृत सुत्रांनी दिली.**

थकबाकीदारांना कर भरणा करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी शास्तीमाफी चे शस्त्र महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अमिता दगडे पाटील यांनी उपसले. याला मालमत्ताधारकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. महत्वाचे म्हणजे सुटीच्या दिवशी वसुलीच्या खिडक्या सुरू ठेवल्याने नागरिकांना शास्तीमाफी सुविधेचा लाभ घेता येतो आहे. शनिवार व रविवार असे सुटीचे दिवस असले तरी देखील मनपातील भरणाकेंद्र सुरू राहणार (पान ४ वर)

## जिल्हा परिषद सीईओ पदाचा नरवडेंनी घेतला पदभार

**धुळे, दि.२९– धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांच्या वादग्रस्त कार्यकाळा मुळे बदली करण्यात आल्याचे बोलले जाते आहे. त्यांच्या जागेवर बुलडाणा जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल सविता तेजराव नरवाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवडे यांनी पदभार घेतला आहे.**




मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल सविता तेजराव नरवाडे हे २०२० बॅचचे अधिकारी आहेत. त्यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण, जिल्हा-नाशिक म्हणून काम केले आहे. सांगली जिल्ह्याचे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. त्यापूर्वी श्री नरवाडे यांनी दिल्ली येथे भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयात सहाय्यक सचिव म्हणून काम केले आहे. नरवाडे हे विदर्भातील एका छोट्या गावातले असून ते जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी आहेत. त्यांची आई जिल्हा परिषदेच्या अंगणवाडी सेविका होती. आणि त्यांचे वडील पशुवैद्यकीय विभागाचे जिल्हा परिषदेचे वर्ग ३ सेवानिवृत्त कर्मचारी आहेत.

### सिध्देश्वर गणपती रस्त्याची दुरवस्था

**धुळे, दि.२९– शहरातील पांझरा नदी किनारी असलेल्या श्री सिध्देश्वर गणपती मंदिराकडून नकाणे रस्त्याला जोडणारा पूल ओलांडतांना रस्त्यात गटारीसाठी मोठा खड्डा करून बुजण्यात आल्याने रहदारीला मोठा अडथळा निर्माण झालेला आहे. पुलाच्या लगत खड्डा आणि वर आलेल्या दगडांमुळे वाहन चालकांना तारेवरची कसरत करत रस्ता ओलांडावा लागतो आहे. रस्ता पुर्ववत करण्याची मागणी नागरिकांमधून केली जाते आहे.**

सार्वजनिक बांधकाम विभागाने पांझरा नदी पात्रा लगत ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी खोदकाम केले. पाईप लाईन टाकून पुन्हा व्यवस्थित न बुजता तसेच सोडून दिल्याने रस्त्यावर खड्डा तसाच पडू दिल्याने नागरिकांसह पांझरा नदी किनारी असलेल्या सिध्देश्वर हॉस्पिटल येथे उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांना त्रास सहन करावा लागतो. अपघात किंवा इतर आजाराने त्रस्त असलेल्या रूग्णांना रूग्णवाहिकांच्या माध्यमातून हॉस्पिटलमध्ये आणले जाते. रूग्णालयाच्या जवळच मुख्य रस्त्यावर खड्डा पडल्याने रस्त्याने उतरणारे व चढणाऱ्या वाहनधारकांना (पान ४ वर)


## जलदान विधी कार्यक्रम



कालकथित.रजनी साहेबराव भामरे
जन्म दि.०२-०८-१९५३ निर्वाण दि.२२-०३-२०२४

कळविण्यात अत्यंत दु:ख.होते की,आमची आई,कालकथित सौ.रजनी साहेबराव भामरे यांचे दि.२२/०३/२०२४ रोजी दुपारी १२.१५ वाजता दु:खद निधन झाले.तरी त्यांचा

*जलदान विधी कार्यक्रम*

रविवार दि.३१/०३/२०२४ रोजी सकाळी १०.००वा. धुळे येथे राहत्याघरी करण्याचे योजित केले आहे.

*शोकाकुल*

डॉ.धम्मपाल साहेबराव भामरे श्री.संघरत्न साहेबराव भामरे
डॉ.सौ.लिना धम्मपाल भामरे डॉ.सौ.वैशाली राजेश म्हस्के
सौ.पल्लवी मिलिंद वाघमारे डॉ.सौ.रुपाली पराग मुन
ओजस,अमन,सौम्या,हर्षुल,अंशुल
ॲड.श्री.बापूसाहेब,साहेबराव विठ्ठल भामरे
समस्त भामरे व मोरे परिवार


निवासस्थान -
बनाई निवास,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कुल,
जवळ,देवपूर धुळे



दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -62,950 रु.+3% GST
सोने- 24 K -68,500 रु.+3% GST
चांदी- 76,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



## हार्दिक अभिनंदन !



डॉ.प्रथम जगदिश गिंदोडिया
तुमच्या MBBS परिक्षेत
उत्तीर्ण करण्याचे हृदयीन अभिनंदन !
शुभेच्छुक
सुनील अग्रवाल अनिकेत अग्रवाल
कल्याणी केमिस्ट, धुळे

# आपला महाराष्ट्र

## देशातील श्रीमंत खेडी आणि शेतकरी

राजकारण, आपसातील हेवे दावे, कोर्ट कचेऱ्या, गरिबी असूनही जातीय अहंकारने भरलेली घरे, स्थानिक निवडणुकांमुळे दुभंगलेली गावे असे असंख्य गावांचे चित्र आपल्याकडे दिसते. परंतु या परिस्थितीतून बाहेर पडून स्वत:ची प्रगती करून घेणारी गावे विरळीच आहेत. अशा गावांच्या विकासाचा मार्ग गांधीजींच्या तत्वज्ञानातून जातो. १९०९ साली हिंद स्वराज्य मधून गांधीजींनी स्वावलंबी व स्वायत्त गावांची संकल्पना मांडत गावाकडे चला असा संदेश दिला होता. मेरे सपनोका भारत या पुस्तकात देखील त्यांनी आदर्श व टुमदार गावांची संकल्पना चितारली आहे. स्वातंत्र्य मिळून सत्याहत्तर वर्षे झाली तरी ती संकल्पना प्रत्यक्षात अवतरली नाही कारण गावे सत्तेच्या राजकारणात गुरफटली आणि गरीब झाली, लाचार झाली तरी मृगजळाच्या मागे धावण्याचे थांबलेले नाही. जेव्हा गावातील लोक पुढाऱ्यांना गाव दरवाजाची मागणी करतात, समाज भवन ची मागणी करतात, ती त्यांच्यासाठी सर्वांगीण विकासाची संकल्पना असते त्यासाठी ते पाठपुरावा करतात याबद्दल सखेद आश्चर्य वाटते. आमच्या गावातील मराठी शाळा बंद पडली आहे. तिची ईमारत शिकस्त झालेली असल्याने नव्याने बांधकाम व्हावे आणि तो परिसर स्वच्छ सुंदर व्हावा अशी मागणी गावकरी करताना दिसत नाहीत. किंवा त्यासाठी स्वयंसेवी पध्दतीने पुढाकार घेत नाहीत. स्व प्रगती बाबतही गावे उदासीन असतात असा अनुभव आहे. गावांची ही हालत गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आल्यावर ओळखली होती, त्यासाठी त्यांना त्यांचे राजकीय गुरू नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी आधी देशभराचा दौरा करून खेडी व शहरे बघण्यास सांगितले होते. त्यानुसार गांधींजींच्या संकल्पनेतून गाव कसे असावे याबद्दलचे चित्र तयार झाले पण राज्यकर्त्यांनी त्याकडे दुर्लक्ष करीत तो कार्यक्रमच नाकारला होता. यातून बाहेर पडून काही गावांनी स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. आज ती गावे देशातील सर्वाधिक समृध्द गावे आहेत. हिवरे बाजार आणि राळेगण सिध्दी ही दोन महाराष्ट्रातील गावे त्यात आहेत. पण फार कमी लोकांनी ती बघितली असतील. धर्मकारणातच गावांना अडकून ठेवण्यात सध्याची राजकीय व्यवस्था मश्गुल आहे आणि गावे देखील त्यातच मग्न आहेत. त्यांना ग्लानी आलेली आहे. स्वत:हून ती दु:खी कष्टी झाली आहेत. मात्र यातून बाहेर पडून विकास साधणारी हिवरे बाजार व राळेगण सिध्दी सारखी गावे आहेत. देशात आणखी ही काही गावे आहेत. या गावांचा चेहरा मोहरा दर्शविणारा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर फिरतो आहे.

अतिशय आनंददायी चित्रफित सध्या फिरत असून ती गावे बघण्याचा मोह कुणालाही व्हावा. त्यांचे अनुकरण करून आपले गाव तसे व्हावे यासाठी पुढाकार घेणारांची संख्या वाढली पाहिजे. तसे झाल्यास देशाचे चित्रच बदलेल. गुजरातमध्ये अशी तीन गावे आहेत त्यापैकी एक आहे मझापार हे गाव. १९९० पासून हे गाव हायटेक गाव म्हणून ओळखले जाते. गावातील प्रत्येक व्यक्ती करोडपती असून देशातील कार्पोरेट सेक्टर मधील कंपन्यांचे मिटिंग हब म्हणून ते ओळखले जाते. हॉटेल आणि बैठकांसाठी कितीतरी सभागृह ईथे बांधलेले दिसतील. साहजिकच इथली शेती समृध्द आहे. आणि बाकीच्या सर्व सोयी सुविधा ईथे दिसतील. देशातील पहिले हायटेक व्हिलेज म्हणून या गावाची ओळख आहे. बलदिया हे दुसरे गुजरातेतील गाव आहे ज्या गावाची स्वत:ची परिवहन सेवा आहे. त्यामुळे रस्ते रूंद आणि प्रशस्त आहेत. गावाची लोकसंख्या फक्त पाच हजार असून एकूण बाराशे कोटी रूपयांची इथली अर्थ व्यवस्था आहे. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या हे गाव संपन्न असून संतुष्ट देखील आहे. गुजरात मध्ये जाणारांनी ते अवश्य बघावे. तिसरे गुजरातेतील गाव आहे साबरकांठा नजीकचे पुंछनी गाव. हे गाव पंचायत राज राबविणारे असून शहरात ज्या सोयी सुविधा असतात त्या सर्व ईथे आहेत. शिक्षण, वीज, पाण्याचा निचरा, सांडपाण्याचे नियोजन, स्वच्छता, जल सिंचन, बागायती, आधुनिक संचार व्यवस्था हे सारेच ईथे सापडेल. ईथले दर डोई उत्पन्न ईतर गावांच्या तुलनेत शंभर पटींनी अधिक आहे. कर्नाटकमध्ये हम्पी असे एक गाव आहे जे विजयनगरचे साम्राज्य म्हणून ओळखले जाते. त्या सर्व खुणा येथे आहेत ते बघून मन प्रसन्न व्हावे अशी वास्तुशिल्पे, मंदिरे, राजवाडे ईथे आहेत. त्याच बरोबर छोटेसे गाव आहे. या गावात विदेशी पर्यटकांसाठी रशियन व ईस्त्राईली भोजन मिळते. तसेच संगीत साधनांचे वर्कशॉप आहेत. विविध वस्तू आहेत. घराघरात पर्यटकांना राहण्यासाठी व्यवस्था आहे. त्यामुळे हे गाव जगाच्या नकाशावर चमकले असून आर्थिक दृष्ट्या संपन्न आहे.

महाराष्ट्रातील हिवरे बाजार हे गाव पूर्वी वाटमारी, बेरोजगारी, आणि स्थलांतरित जमातींचे म्हणून ओळखले जायचे. दुष्काळ पाचवीला पूजलेला होता. परंतु जल संधारणाचे व मृदा संधारण, पर्यावरणाचे सामुदायिक प्रयोग ईथे झाले. ते सर्व यशस्वी झाले असून त्यामुळे गावची शेती समृध्द झाली. सिंचनाचे स्वयंभू प्रकल्प आले. १९९० नंतर या गावाचा बाजच बदलला. यास कारण तिथले सरपंच पोपटराव पवार होत. त्यांनी गांधीजींचा मंत्र जपला आणि लोकांना तो पटवून दिला. त्यामुळे गावाचा कायापालट झाला. राळेगण सिध्दी अण्णा हजारे यांच्यामुळे सर्वांनाच माहिती आहे. त्या गावचे आजचे दर डोई उत्पन्न ३० हजार ते एक लाख रूपये मासिक आहे. २३५ घरांपैकी साठ टक्के लोक आज लखपती आहेत. हिमाचल प्रदेशातील मरोड नावाचे गाव सफरचंद उत्पादनात अग्रेसर असून विदेशात लेन देन आहे. वर्षाचे उत्पन्न साठ लाख ते सत्तर लाख रूपये प्रत्येकी आहे. निसर्ग सुंदर अशा या गावाचा आर्थिक कारभार व व्यवस्था बघण्यास व तिथल्या निसर्गात रममाण होण्यास लोक दूरून येत असतात. अशा गावांची आज देशाला गरज असून लोकांनी लाचारी ची आणि धार्मिक अंधश्रध्देची झूल फेकून देण्याची गरज निर्माण झाली आहे.

## तऱ्हाडीतील युवक लोटन धनगर यांचा अपघाती मृत्यू

तऱ्हाडी, दि.२९ (प्रतिनिधी)- येथील रहिवासी लोटन डिंगबर धनगर (वय ४८) हा दि.१५ मार्च रोजी सकाळी साडेसात वाजता तऱ्हाडी येथील बसस्थानकावर रस्ता ओलांडत असताना शहादा कडून शिरपूरकडे जाणाऱ्या कंटेनरने समोरून धडक दिल्याने गंभीर जखमी झाला होता. त्याला मामेभाऊ महेंद्र धनगर यांने शिरपूर येथे जिल्हा उप रूग्णालयात दाखल केले. गंभीर जखमी झाल्याने त्याला धुळे येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु उपचार सुरू असताना दि.२२ मार्च रोजी सकाळी सहा वाजता त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## कवितेस पारितोषिक

(पान १ वरुन) माध्यमातून प्रणाली मराठे यांनी भिडेवाड्याची दूर्दशा ते भविष्यातील राष्ट्रीय स्मारक असा भिडेवाड्याचा प्रवास भिडेवाड्याचं दुःख त्यांच्या कवितेच्या माध्यमातून मांडले आहे. पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथे ३१ मार्च रोजी संपन्न होणार आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## जागतिक रंगभूमी दिनी नंदुरबार जिल्ह्यातील निवडक कवींच्या निवडक कवितांचा अनोखा कार्यक्रम संपन्न

**नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी)- येथे निर्माण कलामंच नंदुरबारतर्फे नंद कवी रंग या अनोख्या कार्यक्रमाने जागतिक रंगभूमी दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात नंदुरबार जिल्ह्यातील निवडक कवींच्या निवडक कविता सादर करण्यात आल्या.**

नंदुरबार येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाच्या प्रांगणात खुल्या जागेत गाडगेबाबा शैक्षणिक व सांस्कृतिक सेवा मंडळाचे निर्माण कलामंच तसेच विश्व हिंद धर्म सेवा संस्था नंदुरबार व बालरंगभूमी परिषद नंदुरबार जिल्हा शाखेच्या वतीने जागतिक रंगभूमी दिनाचे औचित्य साधून नटराज पूजन व नंद कवी रंग या काव्य वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर भावसार व निंबाजीराव बागुल यांच्या हस्ते नटराज पूजन करण्यात आले. यावेळी सुप्रसिद्ध मूर्तिकार मनोज वसईकर, नाट्यदिग्दर्शक रविदा जोशी, ज्येष्ठ पत्रकार तथा साहित्यिक रमाकांत पाटील, अभिनेते रणजीत राजपूत, नाट्यकर्मी मनोज सोनार, नागसेन पेंढारकर, राजेश जाधव, प्रा.माधव कदम, दिग्दर्शिका क्षमा वासे-वसईकर, तुषार ठाकरे, कुणाल वसईकर आदि उपस्थित होते. नटराज पूजन झाल्यानंतर नंदुरबार जिल्ह्यातील कवी वाहरु सोनवणे, स्वर्गीय चामुलाल राठोड, कांतीलाल पाडवी, सारनाथ आगळे, निंबाजीराव बागुल व रमाकांत पाटील या मान्यवरांच्या निवडक कवितांचा मनंद कवी रंगफ हा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला.



सदर कार्यक्रमात नाट्यकर्मी नागसेन पेंढारकर, तुषार ठाकरे, राजेश जाधव व धर्मेंद्र भारती यांनी या कवितांचे सादरीकरण त्यांच्या शैलीत केले. विद्रोही साहित्य संमेलनाची माजी अध्यक्ष वाहरू सोनवणे यांची- गोधड, रमाकांत पाटील यांची- आत्महत्या व सारनाथ आगळे यांची अहिराणी कविता- बिनधास्त चाली आठे... या कवितांचे सादरीकरण नागसेन पेंढारकर यांनी केले. धर्मेंद्र भारती यांनी रमाकांत पाटील यांची - नंदुरबार देशा, सारनाथ आगळे यांची - मजुरसना घाम ना सांगा, कांतीलाल पाडवी यांची- मी स्वतःला विसरलो या कवितांचे सादरीकरण केले. राजेश जाधव यांनी स्वर्गीय चामूलाल राठोड यांची- मी तुमच्या बरोबर येईल पण, कांतीलाल पाडवी यांची- घाम, निंबाजीराव बागुल यांची- दैना या कवितांचं सादरीकरण केले तसेच तुषार ठाकरे यांनी स्वर्गीय चामुलाल राठोड यांची- वाहरू भाऊस..., निंबाजीराव बागुल यांची- शापित गाव या कविता सादर केल्यात.या कार्यक्रमातील कवितांना उपस्थितांची भरभरून दाद मिळाली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत नागसेन पेंढारकर यांनी निर्माण कला मंच नंदुरबार तर्फे प्रत्येक महिन्याला खुला रंगमंचाचा वापर करून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल असे सांगितले. सूत्रसंचालन तुषार ठाकरे यांनी केले. यावेळी एन.टी.पाटील, निवेदिता वसईकर, खुशाल राजपूत, विजय पवार, विजय माळवे, कुणाल वीर, रणवीर पेंढारकर, कल्पेश जाधव, गुरु मंडलिक आदी उपस्थित हो-ते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तुषार सांगोरे, जितेंद्र खवळे, रोहित हराळे, गौरव पाटील, ऋषिकेश मंडलिक, पांडुभाऊ गवळी, कुणाल अहिरे आदींनी परिश्रम घेतले.

## क्षुल्लक कारणावरून युवकाचा भोसकून खून

नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी)- शहादा तालुक्यातील सुलवाडे गा-वात जिल्हा परिषद शाळेजवळ धक्का लागून वाद निर्माण झाल्याने एकाची चाकू खोपसून हत्या करण्यात आली. ही घटना २७ मार्च रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सोमनाथ गेंदन सोनवणे याने सुकलाल रघुनाथ पवार यास धक्का मारला. धक्का का मारला, अशी विचारणा केली असता. याचा राग येऊन सोमनाथने रघुनाथ पवारच्या छातीवर वार करून गंभीर जखमी केले. यानंतर त्याचा मृत्यू झाला. म्हसावद पोलीस स्टेशनला फिर्याद नोंदवल्याने सोमनाथ सोनवणे रा.बिलाडी याच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नवापूर शहरात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी

**नवापूर, दि.२९ (प्रतिनिधी) - शहरात शिवजयंती उत्सव समितीतर्फे सालाबादाप्रमाणे यावर्षी देखील शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संध्याकाळी जुनी महादेव गल्लीत श्री शिव प्रतिमा पुजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. डोकारे आदिवासी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन भरत गावीत यांनी अभिवादन केले.**



यानंतर माजी नगराध्यक्ष दामू बिऱ्हाडे, माजी उपनगराध्यक्ष प्रकाश पाटील, माजी नगरसेवक अजय पाटील, विशाल सांगळे, महेद्र दुसाने, अरुणा पाटील, शिवसेना जिल्हा उपप्रमुख हसमुख पाटील, भाजपचे राजेद्र गावीत, सामाजिक कार्यकर्ता शंकर दर्जी, गणेश वडनेरे, मनोहर नगर-ाळे, संजय राणा, विजय पाटील, धाकु मोरे, अजय गावीत, मयुर सिंधी, हेमंत जाधव, शिवसेना तालुका उपप्रमुख प्रविँन ब्रम्हे, विजय सैन, गणेश पाटील, संदिप पाटील, राकेश सोनार, अजय अग्रवाल, उत्सव समितीचे अध्यक्ष अशतोश सोनार, शिवसेना शहर प्रमुख अनिल वारुडे, मनोज बोरसे, प्रेमेंद्र पाटील, महेश पाटील, गोलु पाटील, विजय तिजवीज, कमलेश पाटील, विजय बागुल, आनंद वाघ, कुंदनताई पाटील, रेखाबेन राणा, उज्वलाताई वडनेरे, वंदना पाटील, उत्सव समितीचे उपाध्यक्ष नरेंद्र मराठे, उपाध्यक्ष संजय सोनी, कोषाध्यक्ष जितेंद्र अहिरे, मिरवणूक प्रमुख अनिल दुसाणे, हितेंद्र पाटील, किशन शिरसाठ, पोहेका दादाभाई वाघ, नितिन नाईक आदीनी महाराजाचा प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. यानंतर ढोल ताशाच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजाची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रा जुनी महादेव मंदीर श्रीराम मंदीर गल्ली, सरदार चौक, लाईट बाजार,परदेशी सायकल मार्ट,शिवाजी रोड या मार्गाने फिरुन शोभायात्रा जुनी महादेव गल्ली येथे सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीचे सर्व पदधिकारी यांनी परीश्रम घेतले. यावेळी कोणताही अनुसुचित प्रकार होऊ नये म्हणून पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर वारेंसह पोलिस कर्मचारी यांनी चोख बदोबस्त ठेवला होता.

## ग्रामीण राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत विविध स्तरावर जागतिक क्षयरोग दिन साजरा




**धुळे, दि.२९- धुळे ग्रामीण राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हा क्षयरोग केंद्र धुळे ग्रामीण मार्फत जागतिक क्षयरोग दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त जिल्हास्तर, तालुकास्तर, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तर, तसेच सूक्ष्मदर्शक स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.**

जिल्हास्तरीय कार्यक्रम जिल्हा क्षयरोग केंद्र, धुळे ग्रामीण येथे साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगावकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सोनिया बागडे, डॉ.संजय मोरे, डॉ.रवी सोनवणे, डॉ.कुलदीप गजरे उपस्थित होते. सूत्रसंचालन जिल्हा पीपीएम समन्वयक प्रतिभा पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ.रॉबर्ट कॉक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच सर्व उपस्थितांनी क्षयरोग मुक्त भारत अभियानाची शपथ घेतली तसेच पंतप्रधान टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत बनवलेल्या स्टिकरचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. दोन क्षय रुग्णांना पोषण आहार किट वाटप करण्यात आले. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातील उत्कृष्ट काम करणाऱ्या क्षयरोग पथकांचा तसेच निक्षय मित्रांचा प्रमाणपत्र व बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. रांगोळी द्वारे टिबी मुक्त धुळे या संकल्पनेचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगावकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सोनिया बागडे यांनी सर्वांना निक्षय मित्र बनवून क्षय रुग्णांना कोरडा पोषण आ-हार पुरविण्यासाठी आव्हान केले. या कार्यक्रमात जिल्हा क्षयरोग केंद्राचे सर्व अधिकारी तथा कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रदर्शन डॉ.मोहिनीराज देशपांडे यांनी मानले.



## सरस्वती विद्यालयात शिवजयंती साजरी


**शहादा, दि.२९ (प्रतिनिधी) - तालुक्यातील डोंगरगाव येथील सरस्वती प्राथमिक विद्या मंदिर आणि मुक्ताई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.**

याप्रसंगी सन्मित्र क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रा.ज्ञानी कुलकर्णी, सोना-लीताई सोनार, संस्थेचे समन्वयक प्रा.डी.सी.पाटील, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका हर्षदा पाटील आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महाराजांच्या प्रतिमेस पुष्प-हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म, अफजल खानाचा वध व शिवराज्याभिषेक याचे प्रत्यक्ष सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी छत्रपतीच्या जयघोषाने विद्यालय निनादले. उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ.वसंत पाटील, सचिव मुक्ताताई पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षिका मनिषा आमले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## गळफास घेवून एकाची आत्महत्या

धुळे, दि.२९- साक्री तालुक्यातील कुडाशी पो. जामन्यापाडा येथील तीस वर्षीय इसमाने दोरीने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, कुडाशी पो. जामन्यापाडा गावातील दिपक मोतीराम शिंदे (वय ३०)हे लहान मुलांच्या झोक्याच्या दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. दिपक शिंदे यांना पिंपळनेर ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी आणले असता डॉ.राकेश मोहने यांनी तपासून मयत घोषित केले. याप्रकरणी पिंपळनेर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### शब्दकोडे क्रमांक.१८८९



**आडवे शब्द :** १.व्याजाने पैसे देणारा एक व्यक्ती ४.राजवाडा ६.उपस्थित ८.जड ९.इंग्रजीत-राजेशाही थाट १०.भिंतीवर राहणारा एक जीव ११.१९९९साली कारगिल युदधाच्यावेळी पाकिस्तानच्या तावडीतून सुखरूप सुटून आलेला भारतीय वायू सेनेचा वैमानिक १४.एक फळभाजी १६.प्रेत १८.माराचे वण १९.धनुष्य २०.कोलकाता येथील प्रसिदध पुल २२.एक सारखी विभागणी केलेले २३.वानर २५.पाठीचा कणा २६.पातळ ,द्रव २७.स्वभाव ,दुश्मनावर कुरघोडी करण्यासाठी रचलेला डाव २८.जाडजूड बांध्याचा ३०.विचार ३१.पंथ ३४.मसाला कुटण्याचे साधन ३७.कक्ष ३८.हिंदीत-उंची ३९.पाठलाग ४०.आधार ४२.लग्नात करा घेऊन मिरवणारी ४४.इंग्रजीत-पत्ता ४५.नासके ४८.वल ४९.दाणेदार सांजा ५०.साल ५१.तीन दशक मिळून तयार होणारी संख्या

**उभे शब्द :** १.हळू हळू २.निगा ३.सोने ४.मरण पावलेला ५.उपाय ६.भारी नसलेला ७.दुधापासून बनवली जाणारी एक मिठाई ९.केरोसिन १२.पोहे,फरसाण वगैरे मिसळून तयार केलेला पदार्थ १३.हिंदीतील ‘हवाई जहाज’ मराठीत १५.कठीण १७.पायताण १९.जास्तीत जास्तअसलेली मर्यादा २१.वकीली २२.साधा ,करण्यास सोपा २३.संपत्ती २४.तबल्याचा साथीदार २५.फळाच्या आतील गर २९.धनी ३२.अपमान ३३.राग ३५.एक उभयचर पक्षी ३६.रानटी ३९.पश्चिम दिशा ४०.दम ४२.इंग्रजीत-जाणे ४३.खबर ४५.दूध आटवून बनवले जाते ४६.कपाळावर येणारा केसांचा झुपका ४७.बाष्प

### शब्दकोडे क्रमांक.१८८८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चिं | ता | | वा | ज | वी | | पु | री | | सा | व |
| त | क | रा | र | | ट | र | का | | आ | द | त |
| न | | म | दा | री | | म | र | ग | ळ | | न |
| | म | | त | | व | जा | | र | | सं | |
| प | ण | ती | | न | डा | न | ड | | मु | घ | ल |
| र | का | | बी | | पा | | ग | र | बा | | ढा |
| व | | शी | | अ | व | ता | र | | र | ग | |
| ड | बा | | भा | स | | | | टो | क | | शि |
| | र | स | | र | जा | | ज | ल | | का | का |
| मा | दा | | सा | दा | | धा | व | | मि | | री |
| स | न | म | | र | स | म | | खु | ला | सा | |
| ळी | | ती | ट | | त्ता | | जि | रा | फ | | हो |








धुळे- गुडफ्रायडे निमित्त प्रभू येशूंचा जिवंत देखावा असलेली प्रायश्चित फेरी कनोसा हायस्कूलपासून काढण्यात आली. या रॅलीचा समारोप सेंट अँन्थोनी चर्चमध्ये झाला. यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रभू येशूंचा क्रूसवरील देखावा मन हेलावणारा होता.

## निधन वार्ता

### पार्वताबेन पाटील



म्हसावद, दि.२९- शहादा तालुक्यातील मामाचे मोहिदे येथील रहिवासी पार्वताबेन शंकर पाटील वय (वय ८४) यांचे दि.२८ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या प्रगतीशील शेतकरी शरद शंकर पाटील यांचा आई तर सिव्हिल इंजिनिअर परमानंद शरद पाटील यांचा आजी होत.

### सिध्देश्वर गणपती रस्त्याची दुरवस्था

(पान १ वरुन) गतीरोधक ओलांडतांना होणारा त्रास सहन करावा लागतो. गणपती पुलापासून ते नकाणे रोड पर्यंत रस्त्याच्या तेवढ्या भागाची दुरवस्था झाली आहे. या रस्त्याची तात्काळ दुरूस्ती करण्यात यावी अशी मागणी रूग्णांच्या पालकांसह नागरिकांकडून केली जाते आहे.

पान १ वरुन

### महिलांचा सामोडे चौफुलीवर रास्ता रोको

ऐकण्याच्या तयारीत नव्हत्या. यावेळी स्थानिक महिला सदस्या देखील आल्या. त्यांचेही जनता ऐकायला तयार नव्हत्या. त्या म्हणाल्या आम्ही घोड्यमाळ परिसरातील पाण्याच्या समस्या मांडल्या आहेत. या परिसरात पाच ग्रा.पं सदस्य निवडून जातात व सामोरे पंचायतीवर सर्वात जास्त महसूल हा याच भागातून जमा होतो. परंतू पंचायत गांभीयनि विचार करत नाही. यावेळी संतप्त नागरिकांनी आमचा भाग हा पिंपळनेर नगरपरिषदेला जोडून देण्याचीही मागणी केली. दूरध्वनीवरून पोलिसांनी जि.प सदस्य दीपक भारुडे, सरपंच आरती भारुडे तसेच ग्रामसेवक लाडे यांच्याशीही बोलणे केले. मात्र प्रत्यक्ष कामाला सुरुवात होत नाही तोपर्यंत आम्ही रास्तारोको मागे घेणार नाही, असा पवित्रा महिलांनी घेतला. यावेळी उपसरपंच सचिन शिंदे यांनी समस्या ऐकून घेतल्या. सायंकाळपर्यंत नवीन पाईप टाकून पाण्याची व्यवस्था करून देतो, आपण नवीन एक विहीरही अधिग्रहित केली आहे, त्यामुळे पाण्याचा प्रश्न नक्की सुटेल असे आश्वासन दिले. त्यांनी लागलीच ठेकेदाराला व वॉटरमनला घटनास्थळी बोलावुन कामाला सुरुवात करण्यास सांगुन तसेच पाण्याच्या टँकरचीही वाढ करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर महिलांनी या जागेवरून आपला मोर्चा हटवला.मात्र सायंकाळपर्यंत पाणी न आल्यास पुन्हा उद्या रास्तारोको करु, असा इशाराही महिलांनी दिला.

यावेळी डॉ.यतिष घरटे, शिवसेनेचे अभय शिंदे, सा. कार्यकर्ते राजेंद्र घरटे, पीएसआय चौरे व पोलिसांनीही मार्ग काढण्यासाठी सहकार्य केले. मात्र टेंभारोड, सामोडे घोड्यामाळ, पोलीस स्टेशन परिसरात व नवापूर रोड परिसरातील सामोडे ग्रामपंचायतने पाण्याची समस्या कायमची मिटवावी, अशी मागणीही यावेळी महिलांनी व नागरिकांनी केली.

### मीनाक्षी पाटील यांचे निधन

नेत्या अशी त्यांची ओळख होती. माहितीनुसार, वयाच्या ७६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्या अलिबाग विधानसभा मतदार संघाच्या १९९५, १९९९ आणि २००९ अशा ३ वेळा आमदार होत्या. १९९९ मध्ये तत्कालीन विलासराव देशमुख सरकारमध्ये त्या काही काळ राज्यमंत्री म्हणून कार्यरत होत्या. रायगड जिल्ह्यात प्रकल्प विरोधी अनेक लढ्यात त्यांचा सहभाग होता. शेकापचे आ.जयंत पाटील, माजी आमदार पंडित पाटील यांच्या त्या भगिनी होत. तर शेकाप नेते आस्वाद पाटील यांच्या त्या मातोश्री आहेत. मीनाक्षी पाटील यांच्या निधनाबद्दल राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातून शोक प्रकट केला जात आहे.

### मालमत्ताधारकांनी केला करभरणा

आहेत. गुड फ्रायडे या सुटीच्या दिवशी दोनशे त्रेचाळीस थकबाकीदारांनी रोख करभरणा केला. सत्त्याऐंशी धनादेशाद्वारे तर बहात्तर मालमत्ताधारकांनी ऑनलाईन करभरणा केला. तसेच मनपाच्या हद्दवाढ भागातील एकूण एकशे तीन थकबाकीदारांनी रोख करभरणा केला. लोकसभेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्याने आचारसंहिता लागू असली तरी महापालिकेने आयुक्त अमिता दगडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करवसुलीचा धडाका लावण्यात यश मिळविले आहे.

### दहावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा

आहे. मात्र काही शाळांमध्ये याचे उत्तर हेलियम असल्याचे तर काही शाळांमध्ये योग्य उत्तर हायड्रोजन असल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे संभ्रमाची स्थिती निर्माण झाली होती. या प्रश्नाच्या उत्तरासंदर्भातील ही संदिग्धता लक्षात घेता या दोन्ही उत्तरांना तूर्त पूर्ण गुण देणे उचित होईल. पुढच्यावेळी सुधारित उत्तरासाठी उचित सुधारणा करता येतील. आता मुलांचे गुण कमी का करायचे? वर्षभर मेहनतीने अभ्यास करून चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हायची इच्छा बाळगणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांकरिता एक गुणही अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे याबाबत तातडीने निर्णय जाहीर होणे आवश्यक होता. ही मागणी मान्य होण्यासाठी शिक्षक भारती संघटनेचे राज्याध्यक्ष अशोक बेलसरे, राज्य कार्याध्यक्ष सुभाष मोरे, राज्य संघटक सचिव अशपाक खाटीक, नाशिक विभागीय अध्यक्ष विनोद रोकडे, जिल्हाध्यक्ष आबासाहेब पाटील, सचिव नानासाहेब महाले, कार्याध्यक्ष खेमचंद पाकळे, सुधाकर पाटील, रावसाहेब चव्हाण, जयवंत पाटील, किरण मासुळे, दामोदर पाटील, राजेश शिरुडे, जी.आर. माळी, महेंद्र जगताप, शैलेश धात्रक आदींनी सुचना केली होती.

### गतिरोधक बसविण्याची मागणी

ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे आणि गतिरोधक बसवावे. या महत्वपूर्ण आणि अत्यंत आवश्यक मागणी संदर्भात आरटीओ, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहर वाहतूक शाखा, पोलीस विभाग, नंदुरबार नगर परिषद यांना पत्र देऊन आदेशित करावे अशी मागणी नंदुरबार जिल्हा फोटोग्राफर असोसिएशनतर्फे करण्यात आली आहे. या निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष प्रफुल्ल निकुंभे, माजी अध्यक्ष राकेश तांबोळी, संदीप महाजन, गोविंद अग्रवाल, महादू हिरणवाळे,नितीन पाटील, सुनील कुलकर्णी, गणेश पारेख, मयूर चौधरी, पियुष सोनार, कांतीलाल जावरे, विष्णू रामचंदाणी, मनोज उचलाणी, गिरीश पाटील, कपिल पाटील, रवींद्र पाटील, गणेश पाटील, रवींद्र पाटील, पंकज सोनवणे, रोहित गांगुर्डे, पुष्पेन्द्र राजपूत, चेतन यादव, समाधान पाटील, पंकज पाटील, सचिन मराठे, अश्विन बनछोड, किरण गोंधळी, दीपक सोनार, निहाल ठाकूर, दीपक अहिरे, जगदीश चव्हाण, तुषार पाटील, वैभव थोरात, मयूर मराठे, योगेश पाटील, संतोष चित्ते आदी छायाचित्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पान १ वरुन

### काँग्रेसला वसुलीची नोटीस

रमेश यांनी सांगितले. प्राप्तिकर विभागाने काँग्रेस पक्षाकडून करवसुलीबाबत सुरू केलेली प्रक्रिया थांबवावी, या मागणीसाठी दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. ही याचिका काल कोर्टाने फेटाळून लावली. त्यानंतर विभागाने लगेचच पक्षाला १ हजार ७०० कोटींच्या वसुलीची नोटीस पाठवली. ही वसुली २०१७-१८ आणि २०२०-२१ या दोन वर्षांतील आहे. प्राप्तिकर विभागाने २०१७ ते २०२१ या चार वर्षांच्या काळातील काँग्रेसच्या बँक व्यवहाराची तपासणी सुरू केली आहे. त्याविरोधात पक्षाकडून याचिका दाखल करण्यात आली होती. त्याआधी २०१४-१५ ते २०१६-१७ या कालावधीतील तपासणी करून पक्षाला वसुलीची नोटीस पाठवली होती. त्यानंतर पक्षाची बँक खाती गोठवण्यात आली. त्यावेळी सुमारे दीडशे कोटींची वसुलीही करण्यात आली होती.

### केजरीवालांना आशीर्वाद द्या

देशातील नागरिकांनी या नंबरवर त्यांचे मेसेजरुपी आर्शीवाद पाठवावे, असे आवाहन सुनीता केजरीवाल यांनी केले आहे. अरविंद केजरीवाल यांना पाठिंबा देण्यासाठी आम्ही व्हॉट्स ॲप मोहीम सुरू केली आहे. त्यानुसार आम्ही एक व्हॉट्स ॲप नंबरही शेअर केला आहे. या नंबरवर तुम्ही केजरीवाल यांना तुमचे आशीर्वाद आणि प्रार्थनारुपी संदेश पाठवू शकता, असे त्या म्हणाल्या.

### नंदुरबारचा गड काँग्रेस पुन्हा खेचून..

आहे. या जिल्ह्यातील मतदारांनी काँग्रेसला नेहमीच साथ दिली. यंदा राहुल गांधींच्या सभेत काँग्रेस वरील प्रेम मतदारांच्या डोळ्यात दिसले. काँग्रेसचा हा बालेकिल्ला पुन्हा एकदा खेचून आणण्यात महाविकास आघाडीला यश मिळणार आहे. दहा वर्षांमध्ये मोदी सरकारने कुठलेही आश्वासन पूर्ण केलेले नाही. उलट निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनाच्या विरोधात त्यांनी काम केलेले आहे. काँग्रेस पक्ष सामान्य जनतेला केंद्रबिंदू मानायचा. त्या उलट मोदी सरकार बोटावर मोजण्या एवढ्या उद्योजकांना केंद्रबिंदू मानते. मोदी सरकारचे विरोधात जनमानसात संतापाची लाट आहे. महागाई वाढली आहे. राज्यामध्ये ३५ जागांवर महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून येतील असा आम्हाला विश्वास आहे.

ॲड.के.सी. पाडवी म्हणाले, गोवाल पाडवी यांची निवड प्रदेश पातळीवर झालेली असून ज्या पद्धतीने मोदी सरकार संविधान विरोधात बोलत आहे. लोकशाही वाचवण्यासाठी वकिलाची गरज आहे. म्हणून एक तरुण उमेदवार काँग्रेसच्या वतीने देण्यात आलेला आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा प्रत्येक पदाधिकारी कार्यकर्ते हा उमेदवार आहे, अशा पद्धतीने निवडणूक लढवायची आहे.

ॲड.गोवाल पाडवी म्हणाले, नंदुरबार जिल्ह्यातील अनेक प्रश्न आहेत ते सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी प्रयत्न करीन. महाविकास आघाडीचे सर्वच पदाधिकारी, कार्यकर्ते माझ्या विजयासाठी झटतील असा मला विश्वास वाटतो. उदयसिंग पाडवी म्हणाले, बाजारामध्ये जुन्या गाडीपेक्षा नव्या गाडीची क्रेझ असते. नव्या मॉडेल ला मागणी असते. ॲड.गोवाल पाडवी राजकारणात नवे आहेत पण वडील ॲड.के.सी. पाडवी यांचे ते वारसदार आहेत. राजकीय वारसा त्यांना आहे. त्यामुळे ते निवडून येतीलच हा विश्वास आहे. प्रतिभा शिंदे म्हणाल्या, भाजपाच्या डॉ.हिना गावित यांनी काय काम केले असा सवाल सामान्य माणसं विचारत आहेत. सर्वसामान्य माणसं हे महाविकास आघाडी सोबत आहेत. लोकांनी विना पैशांनी ॲड. गोवाल पाडवी यांना निवडून द्यायचे आहे. लोकशक्ती काँग्रेसच्या बाजूने असल्याने भाजपाच्या गावित यांचा पराभव निश्चित दिसत आहे. माजी आमदार शरद पाटील यांनी देखील काँग्रेसचे उमेदवार शंभर टक्के निवडून येतील तसेच उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या वतीने सर्व पदाधिकारी जोमाने काम करतील, याची खात्री त्यांनी दिली. दिलीप नाईक, सीके पाडवी, विनोद चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर यावेळेस उपस्थित होते. ॲड.के.सी. पाडवी यांनी प्रास्ताविक केले.

### गांजाची अवैध तस्करी रोखली

अधीक्षक ऋषीकेश रेड्डी यांच्या परवानगीने दोन पथके तयार करून सापळा रचला. धुळे शहराजवळील हॉटेल देशविदेश जवळील साक्रीकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहन अडवले. वाहन चालविणारे असीफ नफीस अन्सारी (वय २७)रा.फॉरेस्ट ऑफीसजवळ, गोलविरा वेहुर, रमजान चाळ पहीली खोली, पालघर व त्याचा साथीदार अनिल बाबु पवार (वय ३४),रा.राहणार बोईसर भैय्यापाडा, पालघर यांनी मध्यप्रदेशातून दोन लाख तेरा हजार रूपये किंमतीचा मानवी मेंदूवर परिणाम करणारा गांजा व चार लाख रूपये किंमतीचे वाहन असा एकूण सहा लाख छत्तीस हजार रूपये किंमतीची मुद्देमाल हस्तगत केला. ही कारवाई धुळे शहर पोलीस स्टेशनचे पोनि.धिरज महाजन, पोसई. प्रशांत राठोड, पोसई. गणेश आघाव, पोहवा विजय शिरसाठ, पोकॉ.महेश मोरे, मनिष सोनगीरे, प्रविण पाटील, वसंत कोकणी, रवींद्र गिरासे, कुंदन पटाईत, तुषार पारधी, शाइद शेख, केतन पाटील दुसऱ्या पथकातील पोहवा.दिनेश परदेशी, सचिन गोमसाळे, अमोल पगारे, शाकीर शेख, अमित रनमळे यांनी केली.

### गाथा वीर योद्धांची

इतिहास या पिढीला ज्ञात व्हावा याउद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त शिवराणा भक्तांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन हिंदु सेवा सहाय्य समितीने केले आहे.


**पाहिजेत**
ग्लोबल नं.-01 कंपनी शोरुमसाठी कायमस्वरुपी या तत्वावर मुले पाहिजेत.
1) Salesman - 2 company Payroll Job
2) गोडाऊन किपर - २ पगार १५ हजार पर्यंत
टिप : होतकरू, गरजू आणि कायमस्वरुपी काम करणाऱ्यांनी प्रत्यक्ष भेटावे!
**कोमल इलेक्ट्रॉनिक्स**
५४, झांशी राणी पुतळ्यासमोर, महानगर पालिका कॉम्प्लेक्स, धुळे
7422021111 / 9422793411

**पाहिजेत**
रिसेप्शनिस्ट - लेडीज (ग्रॅज्युएट)
सिस्टर-रात्रपाळीसाठी
- संपर्क -
स्वामिनी फर्टिलिटी सेंटर
२४, मयुर कॉलनी, देवपूर, धुळे
9822841882

**प्लॉट विकणे**
शहराच्या मध्यवर्ती भागात भव्य शॉपिंग मॉल, मल्टीप्लेक्स, हॉस्पीटलसाठी उपयुक्त प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**
महावीर नगर, अग्रवाल नगर, जी.बी. नगर, स्नेहनगर येथील प्लॉट विकणे आहेत.
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**पाहिजेत**
अनुभवी स्टाफ भरणे आहे.
१) आर.एम.ओ. (MBBS/ BAMS/BHMS/BUMS)
२) कॉम्प्युटर ऑपरेटर
३) नर्सिंग स्टाफ
४) रिसेप्शनिस्ट
५) वॉर्डबॉय
६) वॉचमन
७) ड्रायव्हर
अर्जासह समक्ष भेटणे!
वेळ दुपारी १ ते ३
निरामय हॉस्पिटल
व श्वास क्रिटिकल केअर व सिटी स्कॅन सेंटर, ८० फुटी रोड, धुळे

**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**
गुड्घे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
दि.१ एप्रिल ते ६ एप्रिल २०२४ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत.
-: संपर्क :-
डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो)
शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे
फोन नं.०२५६२-२३५११३, भ्रमणध्वनी-०८६००३५१०००
९८८१२७८६९८

**पाहिजेत**
दुकान कामासाठी वय १८ ते ३५ पर्यंत मुले पाहिजेत.
आकर्षक पगार.
लक्ष्मी प्लास्टिक
अग्रवाल भवन शेजारी, हॉटेल तरंग समोर, शिवाजीरोड, धुळे
भेटण्याची वेळ : १ ते ४ पर्यंत

**प्लॉट विकणे**
ग्रेनाईट, मार्बल, बिल्डींग मटेरियल शोरुमसाठी पारोळा रोडटच प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**विकणे आहे**
MIDC नरडाणा येथील प्लॉट विकणे आहे.
क्षेत्रफळ-800 m2
बांधकाम-1880 sq.ft. (20%) RCC
-: संपर्क :-
9372510661

**पाहिजेत**
अकौन्टंट असिस्टंट बी.कॉम. (फ्रेशर)
वय : १८ ते २६
इंग्रजी व मराठी टाईपिंग, टॅली (Tally) चे ज्ञान
-: संपर्क :-
वेळ : सकाळी १० ते ४
9403424581

**शेती विकणे आहे**
न्याहळोद ता.जि.धुळे येथील ०.७३ आर शेती बागायती योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
-: संपर्क :-
7719978947

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत. जागा-०१
Excel आणि Tally चे ज्ञान आवश्यक. समक्ष भेटा!
क्रिष्णा फोम ॲण्ड फर्निशिंग
अवधान, धुळे
9820918218


**पाहिजेत**
स्पेअर पार्टच्या वेअर हाऊस कामासाठी होतकरू मुले पाहिजेत.
-: पत्ता :-
Siddhivinayak Automotive
9822297970

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे. श्री अपार्टमेंट, प्लॉट नं.३३, फ्लॅट नं.११, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
8669660897
9922551193

**पाहिजेत**
अकाऊन्टंट पाहिजे. टॅली कोर्स आवश्यक.
वेळ : १० ते ६.३०
-: संपर्क :-
9822344588

**पाहिजेत**
JIO 5-जी वायफायच्या कामासाठी अर्जंट मुले पाहिजेत. अपेक्षित पगार दिला जाईल.
-: संपर्क :-
9623940161

**आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...**



56 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते **श्री महावीर** इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763

**पाहिजेत**
योगेश झेरॉक्स ॲण्ड स्टेशनर्स, जुने जिल्हाधिकारी कार्यालया जवळ, धुळे येथे कॉम्प्युटर ऑपरेटर व झेरॉक्स ऑपरेटर यांची आवश्यकता आहे.
-: संपर्क :-
9527030722

**पाहिजेत**
दुकान कामासाठी हुशार, होतकरु मुले पाहिजे.
फुल टाईमसाठी.
अनमोल पुस्तकालय
फुलवाला चौक, धुळे

**पाहिजे**
रिटेल मेडिकल स्टोअर्सवर कामासाठी अनुभवी मुलगा पाहिजे.
संजीवनी मेडीकल स्टोअर्स
वाडीभोकर रोड, नेहरु नगर, देवपूर, धुळे
9975368591

**२० वर्षापासून ग्राहकांचा विश्वास असणारे श्री लॅण्ड डेव्हलपर्स घेऊन येत आहे..**
**भक्ती नगर** मासिक सुलभ हप्त्याने प्लॉट विक्री योजना
* योजनेची ठळक वैशिष्ट्ये *
* सदर प्लॉटस्ची योजना ही मुंबई आग्रा हायवेपासून अवघ्या २०० मिटर अंतराच्या आत धुळे एम.आय. डी.सी.समोर रानमळा रस्ता टच.
* प्लॉटची साईज : १२ X ६५ व ११ X ६५ व त्यापेक्षा मोठी साईज उपलब्ध.
* सदर योजनेची प्रवेश फी रु.५००/- असेल.
* एन.ए. व सनद झालेले प्लॉटस्.
* रोखीने व हप्त्याने खरेदीची सोय.
* वास्तुशास्त्राप्रमाणे डी मार्केटींग केलेले प्लॉटस्
* निसर्गरम्य वातावरणातील साईट.
* सर्वसामान्यांसाठी आपल्या बजेटमध्ये आपल्या पाल्यांसाठी चांगल्या गुंतवणूकीचा पर्याय.त्वरा करा!
-: संपर्क :-
श्री.सुभाष भगवान लोकरे श्री.स्वप्निल सुभाष लोकरे
ऑफिस :- २७०९, ग.नं.५, घड्याळवाली मस्जिद जवळ, धुळे
9011765188, 9823412718, (02562) 240109

**फ्लॅट विकणे आहे**
ग्राऊंड फ्लोअर मधील फ्लॅट विकणे आहे. प्रोफेसर कॉलनी, वाडीभोकर रोड. प्राइम लोकेशन
-: संपर्क :-
8329363303
8329366624

**कुलर भाड्याने मिळेल**
आमच्याकडे जम्बो कुलर फक्त ५००/-रु. भाडेतत्वावर दिवसा प्रमाणे मिळेल.
राजु भावसार फेटेवाले
तळघरात
गल्ली, नं.४, धुळे
9422286386

**पाहिजेत**
सिस्टर - ANM, GNM, B.Sc.Nursing
दिवस व रात्रपाळीसाठी
-: संपर्क :-
चिरंतन हॉस्पिटल
३, मयुर कॉलनी, देवपूर, धुळे
02562-225870
297870

**फ्लॅट विकणे आहे**
अग्रवाल नगरमधील 2 BHK चा खालील मजल्यावरील इंटेरियर फर्निचरसह फ्लॅट विकणे आहे.
-: संपर्क :-
9518509869
9422708015

**जागा भाड्याने देणे आहे**
गल्ली नं.२, लालबाग मारुती चौक, धुळे
सेमी ग्राऊंड
१२X६०=७२० स्क्वे.फूट
-: संपर्क :-
9403424581
9730530877

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी मुले/मुली फुल टाईम/पार्टटाईम पाहिजेत.
मुंदडा बुक स्टॉल
मुंदडा मार्केट, पारोळारोड,धुळे

**शेती विकणे आहे**
चिंचवार परिसरातील शेती विकणे आहे.
-: संपर्क :-
9422775376

**महावीर कार मॉल**
सर्व प्रकारच्या गाड्या खरेदी विक्री केली जाईल.
कमिशन बेसवर.
महावीर ड्रेसेस
शैलेश जैन
फुलवाला चौक, आग्रारोड, धुळे
9765866999
9422286699


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०